# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१०३/२०२०

**विषय : विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत.**

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, त्यानुषंगाने मा.कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी सूचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (Seminar) या परीक्षांच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षांच्या विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१. अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र (Seminar) परीक्षा यापूर्वी घेतल्या गेलेल्या नाहीत अथवा झालेल्या नाहीत, त्या सर्व परीक्षांचे आयोजन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ते दिनांक २५ सप्टेंबर, २०२० दरम्यान Online पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet, Microsoft Team, Zoom, WebEx, Telephone इत्यादी विविध पध्दतीने आयोजित करण्यात यावेत. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डींग विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये ठेवणे आवश्यक आहे. याबाबतचा अधिकचा तपशील संबंधित विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग यांच्या अधिकृत मेल आयडीवर पाठविण्यात येईल. सदर परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या "Campus System" मधून सुरक्षित अंतर्गत गुण नोंदणी (Internal Marks Web Portal) व्दारे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पूर्वी करण्यात यावी.

२. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत (Backlog) परीक्षांच्या वेळापत्रकाचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने विद्यापीठाने निश्चित केलेल्या सेवा पुरवठादाराकडून घेण्यात येईल. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती कळविण्यात येईल.

३. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील सर्व अभ्यासक्रमांच्या नियमित (Reguler) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने विद्यापीठाने निश्चित केलेल्या सेवा पुरवठादाराकडून घेण्यात येतील. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती कळविण्यात येईल.

४. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देणेची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. तथापि offline पध्दतीनेही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर "Campus System" मधून campus.unipune.ac.in/ccep/login.aspx या URL वर विद्यार्थ्यांच्या लॉगीन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) दिनांक १४ सप्टेंबर, २०२० ते दिनांक १७ सप्टेंबर, २०२० पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येतील. मा.विभागप्रमुख, संबंधित विभाग/विषय शिक्षक यांना आवाहन करण्यात येते की, सदरची बाब त्यांच्या विभागांमधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची व्यवस्था करावी व त्यांना यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन करावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/३६१
दिनांक : १२ सप्टेंबर, २०२०

प्राचार्य १२/०९/२०२०
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे-४११ ०३८.

प्रति,
मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग